पुण्य नगरी

# मिरज शासकीय तंत्रनिकेतनमध्ये विभागीय प्रकल्प स्पर्धा

**मिरज / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ पुरस्कृत पुणे विभागीय प्रकल्प स्पर्धा मिरज येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे कार्यशाळा विभागाच्या प्रांगणात पार पडल्या. स्पर्धेंतर्गत तंत्र शिक्षण पुणे विभागातील पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यातील २६ संस्थांनी सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत अतिग्रे येथील संजय घोडावत इन्स्टिट्यूट या संस्थेला कॉस्ट इफेक्टिव्ह इलेक्ट्रिक आयसीयू बेड ड्वेल अ‍ॅक्युएशन या प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयाचे पारितोषिक मिळाले. तर भोर येथील राजगड ज्ञानपीठ टेक्निकल कॅम्पस पॉलिटेक्निक या संस्थेच्या एस बाईक या प्रकल्पास द्वितीय क्रमांकाचे पन्नास हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. पारितोषिक वितरण संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे यांच्या उपस्थितीत व मनपा उपायुक्त राहुल रोकडे यांच्या हस्ते पार पडले.




मिरज : संजय घोडावत इन्स्टिट्यूटला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करताना मान्यवर.

स्पर्धेचे उद्घाटन ग्लोबल डेव्हलपर्सचे प्रमुख चैतन्य देवधर यांच्या हस्ते, संस्थेचे प्राचार्य डॉ. नितीन सोनजे यांच्या उपस्थितीत झाले. सहभागी संस्थांमधील यंत्र, स्थापत्य, संगणक, आयटी, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आदी विभागातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. यामध्ये आधुनिक ड्रोन, आयसीयू बेड, आधुनिक पावर लाईन सेंसर, ऑटो इनिक्रिटर, पॉवर लाईन, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, इलेक्ट्रिक डिव्हाईस, वेब डिझाईन, फायबर ब्रिक्स, महिला सिक्युरिटी पॅनिक अलार्म, फाईल सिमिलरपी एस बैलेंसिंग, सोलर इलेक्ट्रिक पॉवर बॅकअप कोल्ड स्टोरेज, मेडिकल अ‍ॅडव्हान्स ऑटो व्हीलचेअर, परिसर पर्यावरण एअर सोल्युशन उपकरण इत्यादी प्रकल्प सादर केले.

या स्पर्धेसाठी उच्च तंत्र शिक्षण विभागाचे डॉ. व्ही. एम. मोहितकर, तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, सहसंचालक डॉ. डी. व्ही. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

# मिरज शासकीय तंत्रनिकेतनची एनबीए समितीकडून पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

मिरज : मिरजेतील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये दिल्ली येथील नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडीटेशन या समितीने भेट देऊन वैद्यकीय अणुविद्युत या विभागाच्या पदविका अभ्यासक्रमाची व शैक्षणिक कामकाजाची पाहणी केली.

शासकीय तंत्रनिकेतन येथील वैद्यकीय अणुविद्युत या पदविका अभ्यासक्रमाला मानांकनासाठी देशातील सर्वोच्च विद्यापीठ व संस्थांच्या वरिष्ठ तज्ज्ञ प्राध्यापकांचा समावेश असणाऱ्या एनबीए पथकाने भेट दिली. या तज्ज्ञ समितीने तीन दिवस संस्थेच्या विविध प्रयोगशाळा, ग्रंथालय, मुलांचे व मुलींचे वसतिगृहे, कर्मशाळा, कार्यालय या विभागांना भेट देऊन शैक्षणिक अभ्यासक्रम व दैनंदिन कामकाजाची पाहणी केली.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव उपस्थित होते. मिरज शासकीय तंत्रनिकेतनमधील विविध शाखांमध्ये सुमारे ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

विविध निकष व मापदंडाच्या आधारे संस्थेच्या अभ्यासक्रमाचे मूल्यांकन करून समितीने संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केल्याचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी सांगितले.

**मटा अँकर** विद्यार्थी, प्राध्यापकांना काही दिवसांत पोर्टलवरून डाउनलोड करता येणार


# 'ई-कुंभ'वर इंजिनीअरिंग, डिप्लोमाची मराठी पुस्तके

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesgroup.com

**पुणे :** इंजिनीअरिंग, डिप्लोमाची मराठी भाषेतील पुस्तके राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून, त्यांना कठीण वाटणारा अभ्यासक्रम मातृभाषेतून अधिक चांगल्या पद्धतीने समजण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) ई-कुंभ नावाचे पोर्टल तयार केले आहे. येत्या काही दिवसांत पोर्टलवरील पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत डाउनलोड करता येणार आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षण घेण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार उच्च शिक्षणही मातृभाषेतून देण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने पुढाकार घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून 'पीसीसीओई' महाविद्यालयात एक तुकडी मराठीतून इंजिनीअरिंग करीत आहे. इंजिनीअरिंग आणि डिप्लोमाची पुस्तके विद्यार्थ्यांना मराठीसह १२ प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून दिला जात आहेत. त्यासाठी 'एआयसीटीई'ने 'ई-कुंभ' नावाचे पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टलवर इंजिनीअरिंग आणि डिप्लोमाची पुस्तके शाखेनुसार आहेत. सध्या इंजिनीअरिंग आणि डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षांची पुस्तके मराठीत उपलब्ध झाली आहेत.

ई-कुंभवर सध्या कम्प्युटर सायन्स आणि इंजिनीअरिंग, मेकॅनिकल, ईलेक्ट्रीकल, ईलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग, सिव्हिल इंजिनीअरिंग अशा पाच शाखांमधील पुस्तके उपलब्ध आहेत. येत्या काही दिवसांत इंजिनीअरिंगच्या द्वितीय वर्षाची ४६, तर डिप्लोमाची ४४ पुस्तके प्रकाशित करण्याची 'एआयसीटीई'ची योजना आहे. ही पुस्तके विद्यार्थी, प्राध्यापक आणि अभ्यासकांना मोफत नोंदणी करून डाउनलोड करता येणार आहे. त्यासाठी विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी https://ekumbh.aicte-india.org या वेबसाइटला भेट देण्याचे आवाहन 'एआयसीटीई'ने केले आहे.




## कॉपीराइटमुळे पुस्तकांना उशीर?

सध्या 'ई-कुंभ' पोर्टलवरून उडिया भाषेतील पूर्ण पुस्तके डाउनलोड करता येतात. मात्र, मराठीसह इतर भाषांमधील पुस्तकांची फक्त अनुक्रमणिका आणि काही घटक दिले आहेत. ही पुस्तके छापून तयार असली तरी कॉपीराइटविषयक प्रश्नामुळे प्रकाशकांकडेच आहेत. ती विद्यार्थ्यांना विनामूल्य उपलब्ध होण्यासाठी प्रकाशकांशी चर्चा सुरू आहे. येत्या काही दिवसांत पुस्तकाची पूर्ण पीडीएफ विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातील,' अशी माहिती एआयसीटीईच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

# मिरज येथील शासकीय तंत्रनिकेतनला एनबीए मानांकन प्राप्त : नितीन सोनजे

## वैद्यकीय अनुविद्युत पदविका अभियांत्रिकी शाखा महाराष्ट्रातील एकमेव एनबीए मानांकित

मिरज, दि.०२ (प्रतिनिधी)- शासकीय तंत्रनिकेतन मिरज या संस्थेच्या वैद्यकीय अनुविद्युत (मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स) या अभियांत्रिकी विभागाच्या पदविका अभ्यासक्रमाला नॅशनल बोर्ड ऑफ अ‍ॅक्रीडिटेशन नवी दिल्ली यांचे समितीकडून तीन वर्षासाठी म्हणजे २०२३ ते २०२६ साठी नुकतेच एनबीए मानांकन प्राप्त झाले. वैद्यकीय अनुविद्युत या पदविका अभियांत्रिकी शाखा ही महाराष्ट्रातील एकमेव मानांकित शाखा ठरली आहे. विद्यार्थ्यांना नूतन कौशल्याधारित शिक्षण पद्धतीनुसार मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांवर त्यांच्या व्यवसाय व व्यक्तिगत जीवनात या बाबींची अंमलबजावणी करिता करण्यात आलेल्या मूल्यमापनात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सेवा सुविधा यांची तज्ञ समितीने पाहणी केली. हे मानांकन मिळाल्याने या संस्थेच्या माध्यमातून सांगली जिल्ह्याच्या तंत्रशिक्षणाच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक झाल्याची माहिती संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शासकीय तंत्रनिकेतन मिरज या संस्थेच्या वैद्यकीय अनुविद्युत या पदविका अभ्यासक्रमाच्या मानांकनासाठी नॅशनल बोर्ड ऑफ अक्रीडिटेशन नवी दिल्ली या राष्ट्रीय संस्थेच्या वतीने दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी २०२३ या तीन दिवसाच्या कालावधीत समितीने भेट देऊन पाहणी केली होती. यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता व उपलब्धता, टीचिंग लर्निंग प्रोसेस, रिसर्च अँड कन्सल्टन्सी, स्टुडन्ट सक्सेस रेट, करिअर गायडन्स, प्लेसमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर, माजी विद्यार्थी प्रतिक्रिया, आऊट कम बेस्ड एज्युकेशन यांचे सर्वकष मूल्यमापन केले. यावेळी संस्थेमधील वैद्यकीय अनुविद्युत या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विविध प्रयोगशाळा, ग्रंथालय, विद्यार्थी विद्यार्थिनींची वस्तीगृह, कर्मशाळा कार्यालय, इत्यादी विभागांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन संस्थेची पाहणी केली तसेच शैक्षणिक अभ्यासक्रम व दैनंदिन कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली. संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या सेवा सुविधा यांचे मूल्यमापन करून विविध निकष व मापदंडानुसार विद्यार्थी शिक्षक व माजी विद्यार्थी तसेच पालक इत्यादी घटकांकडून प्रत्यक्ष चर्चा करून माहिती घेतली होती. सदरच्या समितीमध्ये प्रोफेसर एस. एन. अहमद जामिया मिल्लीया इस्लामिया विद्यापीठ, न्यू दिल्ली आणि प्रोफेसर टी. श्रीनिवास, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळुरू या तज्ज्ञांचा सहभाग होता. या भेटीदरम्यान डॉक्टर दत्तात्रय जाधव, सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे हे उपस्थित होते.

शासकीय तंत्रनिकेतन मिरज ही संस्था सन १९९० मध्ये स्थापन झालेली पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील नावाजलेली अभियांत्रिकी क्षेत्रातील संस्था असून सन १९९५ मध्ये या संस्थेत वैद्यकीय अनुविद्युत हा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. या संस्थेत विविध शाखेत सुमारे ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उच्च नीतिमूल्य व राष्ट्रीय संवेदना असलेले उद्योगाभिमुख सक्षम तंत्रज्ञान विकसित करणे हे शासकीय तंत्रनिकेतनचे मुख्य उद्दिष्ट आहे. या संस्थेत स्थापत्य अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, पॉलिमर टेक्नॉलॉजी आणि नुकतेच तीन वर्षासाठी मानांकन प्राप्त झालेले वैद्यकीय अनुविद्युत हे पदविका अभ्यासक्रम सुरू आहेत. हे मानांकन प्राप्त झालेने सांगली जिल्ह्याच्या नावलौकिकात मानाचा तुरा खोवला गेला आहे. याकरिता डॉ. अभय वाघ माजी संचालक तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई, डॉ. विनोद मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई, डॉ. प्रमोद नाईक संचालक महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई, डॉ.दत्तात्रय जाधव सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे, मारुती जाधव, सहसंचालक शाहीन उस्मानी, उपसचिव आणि सुधीर पवार सहाय्यक संचालक यांची प्रेरणा व सहकार्य लाभले, तर प्राचार्य डॉ.विराट गिरी डॉ. राजेश पाटील आणि प्राचार्य डॉ. संदीपान नरोटे, प्राचार्य डॉ. शेख, विनायक चौधरी, राजेश सरगर यांचे सहकार्य लाभले. संस्थेतील सर्व विभाग प्रमुख, कर्मशाळा अधीक्षक, अधिव्याख्याते, प्रबंधक, कर्मचारी यांनी हे मानांकन प्राप्त करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले, तसेच विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, संघटना यांचा उत्स्फूर्त सहभाग व प्रतिसादाने संस्थेला हे घवघवीत यश प्राप्त झाल्याचे संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी डॉ. नागेश जानराव, विभाग प्रमुख वैद्यकीय अनुविद्युत अनिल जोशी, संस्था समन्वयक, तसेच सर्व विभाग प्रमुख, कर्मशाळा अधीक्षक व प्रबंधक हे उपस्थित होते.

मंगळवार दि. ४/४/२०२३

दक्षिण महाराष्ट्र केसरी

# मिरज शासकीय तंत्रनिकेतनला एनबीए मानांकन : नितीन सोनजे

## वैद्यकीय, अणुविद्युत पदविका अभियांत्रिकी शाखा महाराष्ट्रातील एकमेव

**मिरज** : शासकीय तंत्रनिकेतन, मिरज या संस्थेच्या वैद्यकिय अणुविद्युत (मेडीकल इलेक्ट्रॉनिक्स) या अभियांत्रिकी विभागाच्या पदविका अभ्यासक्रमाला नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडिटेशन (NB), नवी दिल्ली यांच्या समितीकडून तीन वर्षे म्हणजे २०२३ ते २०२६ साठी एनबीए मानांकन प्राप्त झाले. वैद्यकीय, अणुविद्युत या पदविका अभियांत्रिकी शाखा ही महाराष्ट्रातील एकमेव मानांकीत शाखा ठरली आहे.

विद्यार्थ्यांना नुतन कौशल्याधारीत शिक्षण पद्धतीनुसार मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षण घेवून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांवर त्यांच्या व्यवसाय व व्यक्तिगत जीवनात या बाबींची अंमलबजावणी करण्यात आलेल्या मूल्यमापनात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सेवा-सुविधा यांची तज्ज्ञ समितीने पहाणी केली. हे मानांकन मिळाल्याने या संस्थेच्या माध्यमातून सांगली जिल्ह्याच्या तंत्रशिक्षणाच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक झाल्याची माहीती संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शासकीय तंत्रनिकेतन, मिरजला नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडिटेशन (छ्इ) नवी दिल्ली या राष्ट्रीय संस्थेच्यावतीने दि. १७ ते १९ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत समितीने भेट देवून पहाणी केली होती. यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता व उपलब्धता, टिचिंग लर्निंग प्रोसेस, रिसर्च अँड कन्सल्टन्सी, स्टुडंड सक्सेस रेट, करिअर गाइडन्स, प्लेसमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर, माजी विद्यार्थी प्रतिक्रीया, आऊटकम बेस्ड एज्युकेशन याचे सर्वकश मुल्यमापन केले. यावेळी संस्थेमधील वैद्यकीय अणुविद्युत या पदविका अभ्यासक्रमाच्या विविध प्रयोगशाळा, ग्रंथालय, विद्यार्थी-विद्यार्थीनींची वसतिगृहे, कार्यालय इ. विभागामध्ये प्रत्यक्ष भेटी देवून पहाणी केली. शैक्षणिक अभ्यासक्रम व दैनंदिन कामकाजाचीही पहाणी केली. संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या सेवा-सुविधा याचे मूल्यमापन करून विविध निकष व मापदंडानुसार विद्यार्थी, शिक्षक व माजी विद्यार्थी तसेच पालक इत्यादी घटकांकडून प्रत्यक्ष चर्चा करून माहिती घेतली होती. सदरच्या समितीमध्ये प्रोफेसर एस. एन. अहमद, जामिया मिल्लिया इस्लामिया विद्यापीठ, न्यु दिल्ली आणि प्रोफेसर टी. श्रीनिवास, इंडियन इन्स्टिटयुट ऑफ सायन्स, बंगळुरु या तज्ज्ञाचां सहभाग होता. या भेटीदरम्यान डॉ. दत्तात्रय जाधव, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे हे उपस्थित होते.

## जपानचे परराष्ट्रमंत्री चीन दौऱ्यावर

**टोकियो** : जपानचे परराष्ट्र मंत्री योशिमासा ह्याशी दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर जाणार आहेत. शनिवार (दि.१) पासून त्यांच्या दोन दिवसीय चीन दौऱ्याची सुरूवात होईल. २०१९ मध्ये परराष्ट्र मंत्री झालेले योशिमासा हे पहिल्यांदाच चीनला भेट देणार आहेत.

साप्ताहिक
उमा न्यूज
WEEKLY Uma News

# मिरजच्या शासकीय तंत्रनिकेतनला एनबीए मानांकन

**उमा न्यूज प्रतिनिधी**

**मिरज :** मिरजेतील शासकीय तंत्रनिकेतनच्या वैद्यकीय अणुविद्युत (मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स या अभियांत्रिकी विभागाच्या पदविका अभ्यासक्रमाला नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडिटेशन, नवी दिल्ली या समितीकडून तीन वर्षांसाठी एनबीए मानांकन मिळाले आहे. या मानांकनामुळे जिल्ह्यातील तंत्रशिक्षण क्षेत्राचा नावलौकिक झाल्याचे संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. राज्यातील एकमेव मानांकित वैद्यकीय अणुविद्युत पदविका अभियांत्रिकी शाखा ठरली आहे.



**डॉ. नितीन सोनजे**

विद्यार्थ्यांना नूतन कौशल्याधारित शिक्षण पद्धतीनुसार मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांवर त्यांच्या व्यवसाय व व्यक्तिगत जीवनात या बाबींची अंमलबजावणी याकरिता करण्यात आलेल्या मूल्यमापनात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सेवा-सुविधा यांची तज्ज्ञ समितीने पाहणी केली. नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रिडिटेशन या राष्ट्रीय समितीने ही पाहाणी केली.

यावेळी वैद्यकीय अणुविद्युत विभागप्रमुख डॉ. नागेश जानराव, अनिल जोशी यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

# शासकीय तंत्रनिकेतन मिरज येथे डिप्लोमा प्रवेश प्रक्रिया सुरू

मिरज, दि.०२ (प्रतिनिधी)- शैक्षणिक वर्ष २०२३- २०२४ साठी दहावी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता १ जूनपासून सुरुवात झाली असल्याची माहिती एन बी मानांकन प्राप्त शासकीय तंत्रनिकेतन मिरजचे प्राचार्य डॉ. नितीन सोनजे यांनी दिली. शासकीय तंत्रनिकेतन मिरज या संस्थेत प्रवेश प्रक्रियेचे कामकाज सुरू झाले असून संस्थेला नुकतेच एन बी मानांकन प्राप्त असलेल्या या संस्थेत सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजीनियरिंग, पॉलिमर इंजिनिअरिंग आणि नुकतेच मानांकन प्राप्त मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स हे पदविका अभ्यासक्रम शिकविले जातात. त्याचबरोबर थेट द्वितीय वर्षासाठी इयत्ता बारावीच्या आयटीआय विद्यार्थ्यांना प्रवेश उपलब्ध आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता इयत्ता दहावी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये संदर्भात ऑनलाइन पोर्टलचे तसेच मोबाईल पचे उद्धाटन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभहस्ते तसेच तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी तंत्र शिक्षण संचालनालयामधील अधिकारी डॉ.उमेश कोकाटे, डॉ. गोविंद सांगवी आदींसह अधिकारी उपस्थित होते.

प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा असे सुचित करण्यात आले आहे. औद्योगिक क्षेत्रातील आवश्यक गरजा आणि भविष्यातील संधीचा वेध घेऊन यंदा ९ शासकीय आणि ३० विनाअनुदानित संस्थांमध्ये २४६० प्रवेश क्षमतेचे न्यू इमर्जिंग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. त्याचबरोबर वरील सर्व विविध अभ्यासक्रमांसाठी राज्यातील पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा मागील चार वर्षापासून चांगला प्रतिसाद मिळत आहे. शालेय शिक्षणानंतर तंत्रशिक्षणामधील पदविका तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी उत्तम पर्याय ठरला आहे.असेही मत ना.चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

शासकीय तंत्रनिकेतन मिरज या संस्थेत एमपीएससी कडून निवड झालेले तज्ञ प्राध्यापक वर्ग तसेच दर्जेदार शिक्षण तसेच स्नेहसंमेलन, सपोर्ट, औद्योगिक सहली, तांत्रिक उपक्रम राबविणारी संस्था, प्रशस्त इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा, अत्याधुनिक उपकरणे, कर्मशाळा, विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वस्तीगृह, ग्राहक भांडार, क्रीडांगण, नोकरी सहाय्य, विविध नामवंत कंपन्यांचे कॅम्पस व प्रशिक्षण, उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन अशा सुविधा उपलब्ध आहेत.

पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज ऑनलाईन नोंदणी कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रति किंवा छाया प्रत अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी अर्ज करणे ही प्रक्रिया एक जून पासून सुरू करण्यात आली आहे. सदर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया मोबाईल प वर सुद्धा उपलब्ध आहे. असे संचालनालयाचे पुणे येथील सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव यांनी सांगितले. असल्याची माहिती शासकीय तंत्रनिकेतन मिरजचे प्राचार्य डॉ. नितीन सोनजे यांनी दिली.

लोकमत

# कॉलेजात आता शिकविले जाणार, कसे राहायचे अन् इंग्रजी बोलायचे?

## अभियांत्रिकी, तंत्रनिकेतनसह उच्च शिक्षणात अभ्यासक्रमाचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली** : राज्यातील अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन व उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयातील अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांकरिता अशा अभ्यासक्रमासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि इन्फोसिस यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपयुक्त इंग्रजी संवाद कौशल्य आणि मूल्ये आधारित जीवनशैली अभ्यासक्रम महाविद्यालयात शिकवले जाणार आहेत.

या अभ्यासक्रमासाठी शासनाने इन्फोसिसशी करार केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संवादात फरक पडेल. तसेच, जीवनशैलीचे धडे दिल्याने विद्यार्थ्यांच्या गुणांकनात वाढ होऊन तो जागतिक पातळीवर संधी मिळण्यास पात्र ठरणार आहे. शिवाय विद्यार्थ्यांना स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे.

### विद्यार्थ्यांना इंग्रजी संवादासह जीवनशैलीचे धडे

इंग्रजी संवादाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना अनेक चांगल्या संधी गमावाव्या लागतात. इंग्रजी, संवाद व जीवनशैलीचे धडे दिल्यास अशा विद्यार्थ्यांना जगाच्या पाठीवर संधी मिळू शकतात.



### कोणत्या विद्यार्थ्यांना देणार धडे?

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने २०२१ मध्ये हा करार केला आहे. या करारानुसार अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन व उच्च शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना अशा इंग्रजी संवाद कौशल्ये आणि जीवनशैलीचे धडे देण्यात येणार आहेत.

### उच्च व तंत्र विभाग-इन्फोसिसमध्ये करार

उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि इन्फोसिस यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या नव्या करारानुसार विद्यार्थ्यांना इंग्रजी संवाद कौशल्ये आणि जीवनशैली अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत.




### ९० टक्के उपस्थितीनंतर प्रमाणपत्रही मिळणार



१. अभ्यासक्रम १६५ तासांचा असून विद्यार्थ्यांना तो नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

२. विद्यार्थ्यांनी ९० टक्के उपस्थितीसह अभ्यासक्रम पूर्ण केल्यास डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

इन्फोसिसने अनेक उपक्रम राबविले आहेत. इंग्रजी संवाद कौशल्यासह विद्यार्थ्यांचे भाषेचे ज्ञानही वाढते. मुलाखतीच्ये वेळेसही फायदा होतो. विद्यार्थी-शिक्षक संवादही चांगला होतो. याशिवाय त्यांनी संगणकांचे विविध कोर्सेसही सुरू केले आहेत. त्या साऱ्यांचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होत आहे.

- **कॅ. नितीन सोनजे,** प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

# मिरज तंत्रनिकेतन महाविद्यालयात विभागीय प्रकल्प स्पर्धा

## संजय घोडावत इन्स्टीट्यूट प्रथम, राजगड ज्ञानपीठ टेक्नीकल कॅम्पस पॉलिटेक्निक द्वितीय

**जनप्रवास । मिरज**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळपुरस्कृत पुणे विभागीय प्रकल्प स्पर्धा शासकीय तंत्रनिकेतन मिरज येथे पार पडल्या. या स्पर्धेसाठी तंत्रशिक्षण पुणे विभागातील पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यातील २६ संस्थांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेत संजय घोडावत इन्स्टीट्युट, अतिग्रे (जि. कोल्हापूर) या संस्थेला कॉस्ट इफेक्टिव इलेक्ट्रिक आयसीयु बेड ड्वेल ऍक्यूवेशन या प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयाचे बक्षिस व राजगड ज्ञानपीठ टेक्नीकल कॅम्पस पॉलिटेक्निक, भोर (जि. पुणे) या संस्थेला एस-बाईक या प्रकल्पास द्वीतीय क्रमांकाचे पन्नास हजार रुपयाचे पारितोषिक मिळाले.

सदरचा पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ.एन.पी. सोनजे यांच्या उपस्थितीत व राहुल बाळासो रोकडे, उपआयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचे हस्ते पार पडले. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे या प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन ग्लोबल डेव्हलपर्सचे प्रमुख चैतन्य देवधर यांच्या शुभहस्ते व संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.




**मिरज : राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेचे बक्षीस स्वीकारताना संजय घोडावत विद्यापीठाचे शिक्षक.**

चैतन्य देवधर म्हणाले, की नव-तंत्रज्ञानाचा वापर नवनिर्मिती व समाज उपयोगी ठरवणारा असावा स्वतःमधील बुद्धिमत्ता लक्षात घेऊन विकसनशील तंत्र निर्मिती करण्यात यावी, असे मत व्यक्त केले. तर संस्थेचे प्राचार्य प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले, की स्टार्टअप स्कील इंडिया व डिजिटल इंडिया तसेच मेरी माटी मेरा देश अशा नवनिर्मित योजनेअंतर्गत त्याचे धोरण लक्षात घेता उपलब्ध साधनसामुग्रीचा अचूक वापर करत आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अनेक संधी उपलब्ध होत आहेत. या साठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ वतीने स्पर्धेच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये आधुनिक ड्रोन, आयसीयू बेड, आधुनिक पॉवरलाईन सेन्सर, ऑटो इनव्हिटर, पॉवर लाईन, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, इलेक्ट्रिक डिव्हाईस, वेब डिझाईन, फायबर ब्रिक्स, महिला सिक्युरिटी पॅनिक अलार्म. ऑईल सिमिलरपी एस वॅलंसिंग, सोलर इलेक्ट्रिक पॉवर बँकअप कोल्ड स्टोरेज, मेडिकल ऍडव्हान्स ऑटोव्हीलचेअर, परिसर पर्यावरण एअर सोल्युशन उपकरण इत्यादी प्रकल्प सादर केले.

या स्पर्धेसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. व्ही. एम. मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक व तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे चे सहसंचालक डॉ. डी. व्ही. जाधव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. मान्यवरांचा परिचय डॉ. के आर कुंभोजकर यांनी करून दिला तर सूत्रसंचलन श्रीमती ए एम भोसले यांनी केले व डॉ. आर. एम. ओव्हळ यांनी आभार मानले.

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# मिरज तंत्रनिकेतन महाविद्यालयात विभागीय प्रकल्प स्पर्धा

## संजय घोडावत इन्स्टीट्यूट प्रथम, राजगड ज्ञानपीठ टेक्नीकल कॅम्पस पॉलिटेक्निक द्वितीय

**जनप्रवास । मिरज**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळपुरस्कृत पुणे विभागीय प्रकल्प स्पर्धा शासकीय तंत्रनिकेतन मिरज येथे पार पडल्या. या स्पर्धेसाठी तंत्रशिक्षण पुणे विभागातील पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यातील २६ संस्थांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेत संजय घोडावत इन्स्टीट्युट, अतिग्रे (जि. कोल्हापूर) या संस्थेला कॉस्ट इफेक्टिव इलेक्ट्रिक आयसीयु बेड इव्हेल ऍक्यूवेशन या प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयाचे बक्षिस व राजगड ज्ञानपीठ टेक्नीकल कॅम्पस पॉलिटेक्निक, भोर (जि. पुणे) या संस्थेला एस-बाईक या प्रकल्पास द्वीतीय क्रमांकाचे पन्नास हजार रुपयाचे पारितोषिक मिळाले.

सदरचा पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे प्राचार्य कॅप्टन



**मिरज : राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेचे बक्षीस स्वीकारताना संजय घोडावत विद्यापीठाचे शिक्षक.**

डॉ.एन.पी. सोनजे यांच्या उपस्थितीत व राहुल बाळासो रोकडे, उपआयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचे हस्ते पार पडले. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे या प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन ग्लोबल डेव्हलपर्सचे प्रमुख चैतन्य देवधर यांच्या शुभहस्ते व संस्थेचे प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

चैतन्य देवधर म्हणाले, की नव-तंत्रज्ञानाचा वापर नवनिर्मिती व समाज उपयोगी ठरवणारा असावा स्वतःमधील बुद्धिमत्ता लक्षात घेऊन विकसनशील तंत्र निर्मिती करण्यात यावी, असे मत व्यक्त केले. तर संस्थेचे प्राचार्य प्राचार्य कॅप्टन डॉ. नितीन सोनजे या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले, की स्टार्टअप स्कील इंडिया व डिजिटल इंडिया तसेच मेरी माटी मेरा देश अशा नवनिर्मित योजनेअंतर्गत त्याचे धोरण लक्षात घेता उपलब्ध साधनसामुग्रीचा अचूक वापर करत आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अनेक संधी उपलब्ध होत आहेत. या साठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ वतीने स्पर्धेच्या माध्यमातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये आधुनिक ड्रोन, आयसीयू बेड, आधुनिक पॉवरलाईन सेन्सर, ऑटो इनिक्विटर, पॉवर लाईन, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, इलेक्ट्रिक डिव्हाईस, वेब डिझाईन, फायबर ब्रिक्स, महिला सिक्युरिटी पॅनिक अलार्म. ऑईल सिमिलरपी एस वॅलंसिंग, सोलर इलेक्ट्रिक पॉवर बॅकअप कोल्ड स्टोरेज, मेडिकल ऍडव्हान्स ऑटोव्हीलचेअर, परिसर पर्यावरण एअर सोल्युशन उपकरण इत्यादी प्रकल्प सादर केले.

या स्पर्धेसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. व्ही. एम. मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक व तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे चे सहसंचालक डॉ. डी. व्ही. जाधव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. मान्यवरांचा परिचय डॉ. के आर कुंभोजकर यांनी करून दिला तर सूत्रसंचलन श्रीमती ए एम भोसले यांनी केले व डॉ. आर. एम. ओव्हळ यांनी आभार मानले.